सी.एन.आर. क्र : एम.एच.एल.सी. ३६०००००३८२०१९.

## सदाशिव नेवारे व इतर ... विरुध्द ... शालिकराव भगत व इतर

## निशाणी क्रमांक सी–१८ वर आदेश

गैरअर्जदार क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०६/०३/२०२० रोजी पुरावा नाही असा झालेला आदेश रद्द करुन पुरावा देण्याची परवानगी मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. सदरील अर्जावर विरुध्द बाजुचे म्हणणे मागविण्यात आले. अर्जदारांतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदविला व त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वर नमुद दोन्ही विद्यीज्ञांचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, अर्जदारांनी प्रस्तुतचा मुळ अर्ज कर्मचारी नुकसान भरपाई कायदा, १९२३ च्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०६/०३/२०२० रोजी गैरअर्जदार क्र. १ च्या पुराव्याकरिता ठेवण्यात आली होती. परंतु गैरअर्जदार क्र. १ तर्फे पुरावा दाखल न केल्यामुळे त्याच्याविरुध्द पुरावा नाही असा आदेश पारित करुन त्याचा पुरावा बंद करण्यात आला. तद्नंतर दिनांक ०८/०४/२०२२ रोजी गैरअर्जदार क्र. १ तर्फे प्रस्तुतचा अर्ज देण्यात

LABOUR COURT

आला. गैरअर्जदार क्र. १ चा अर्ज व त्यातील विनंती पाहता दिनांक ०६/०३/२०२० रोजी झालेला आदेश रद्द करणे न्यायोचित होईल असे वाटते. तसेच झालेला विलंब विचारात घेता त्याबाबतचा खर्च गैरअर्जदार क्र. १ वर लादणेदेखील गरजेचे वाटते. त्यामुळे मी वरील सर्व बाबी विचारात घेवुन योग्य न्यायदानाच्या दृष्टीकोनातुन खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आ दे श**

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदारांना अर्जाचा खर्च म्हणुन रक्कम रु. २००/– द्यावेत.

भंडारा. (रो.सु. भोसले–नरसाळे)

दिनांक : ०८/०४/२०२२. आयुक्त,

कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम,

भंडारा.

LABOUR COURT